# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.07.2026** **वारःगुरुवार**

1. जपानच्या पंतप्रधान सानाए ताकाइची भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर; आज नवी दिल्लीत होणाऱ्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होणार
2. विकसित भारत-रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण कायदा देशभर लागू
3. भारतात व्हॉट्सॲपवर 'युजरनेम' हे फिचर सुरू करण्याबाबत केंद्र सरकारची काल मेटा कंपनीला नोटीस
4. अमरनाथ यात्रेसाठी भाविकांची पहिली तुकडी आज रवाना आणि
5. पुढील दोन दिवसांत देशाच्या विविध भागात मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**जपान पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत जपानच्या पंतप्रधान सानाई ताकाइची यांच्याशी वार्षिक शिखर परिषदेच्या स्तरावरील चर्चा करतील. या भेटीदरम्यान दोन्ही देशातील विविध बाबींसंदर्भात अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात येईल. जपानच्या पंतप्रधान तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर काल संध्याकाळी नवी दिल्लीत दाखल झाल्या. त्यांची ही भेट भारत आणि जपान यांच्यातील 'विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारीला पुढे नेण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**भारत-मलेशिया**

नवी दिल्लीत काल झालेल्या 12 व्या उप-समितीच्या बैठकीत भारत आणि मलेशियाने द्विपक्षीय लष्करी सहकार्याच्या सर्व पैलूंचा आढावा घेतला. हिंद-प्रशांत क्षेत्रात शांतता, सुरक्षा आणि नौकानयनाच्या स्वातंत्र्याप्रती असलेली आपली सामायिक कटिबद्धता यावेळी अधोरेखित झाली, असे संरक्षण मंत्रालयाने सांगितले. लष्करी स्तरावरील देवाणघेवाण, द्विपक्षीय सराव, प्रशिक्षण, कर्मचारी-स्तरीय चर्चा,क्षमता बांधणी, सागरी सहकार्य आणि उदयोन्मुख क्षेत्रांमधील सहकार्य आदी मुद्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

**जीरामजी**

विकसित भारत - रोजगार आणि उपजीविका हमी अभियान ग्रामीण अर्थात VB-G RAM G कायदा, 2025' कालपासून देशभर लागू झाला. या कायद्याअंतर्गत, पात्र ग्रामीण कुटुंबांना आता 125 दिवसांच्या रोजगाराची हमी मिळणार आहे. काम न मिळाल्यास बेरोजगार भत्ता मिळण्याची सुविधा या कायद्यात आहे. हा कायदा जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेईल. हा कायदा लागू झाल्याच्या निमित्तानं आंध्र प्रदेशातल्या तिरुपती जिल्ह्यात आज एक राष्ट्रीय शुभारंभ कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान या कार्यक्रमाला उपस्थित राहतील.

**महामार्ग**

केंद्र सरकारनं दिल्ली आणि उत्तर प्रदेशातल्या 14 हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या दोन मोठ्या महामार्ग पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजूरी दिली आहे.दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल ही माहिती दिली. या प्रकल्पांमध्ये दिल्लीतील 6 हजार 969 कोटी रुपयांचा बोगदा प्रकल्प आणि उत्तर प्रदेशातील 7 हजार 145 कोटी रुपयांचा 'ग्रीनफील्ड' महामार्ग कॉरिडॉर यांचा समावेश आहे, असंही अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**निवडणूक**

एक राष्ट्र, एक निवडणूकीमुळे आदर्श आचारसंहितेची वारंवार करावी लागणारी अंमलबजावणी कमी होईल, प्रशासन सक्षम होईल आणि अर्थव्यवस्थेला फायदा होईल, असं मत एक राष्ट्र, एक निवडणूक या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी पी चौधरी यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या दशकांमध्ये लोकसभा आणि राज्य

विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्या गेल्या, मात्र अनेकदा विधानसभा वेळे आधीच विसर्जित झाल्यामुळे किंवा काही राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाल्यामुळे निवडणूक चक्र विस्कळीत झालं असंही चौधरी यांनी यावेळी सांगितलं.

**व्हॉट्सॲप**

भारतात व्हॉट्सॲपवर 'युजरनेम' हे फिचर सुरू करण्याबाबत केंद्र सरकारनं काल मेटा कंपनीला नोटीस बजावली आहे. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने मेटाला या युजरनेम वैशिष्ट्याबाबत तीन दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती आकाशवाणीच्या वार्ताहरांनी दिली. व्हॉट्अप वापरताना केवळ युजरनेमचा वापर झाला तर ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, 'डिजिटल अरेस्ट'चे प्रकार आणि दुसऱ्याचं युजरनेम वापरुन होणारे सायबर हल्ले वाढण्याची शक्यता आहे, अशी चिंता मंत्रालयानं व्यक्त केली आहे.

**आरोग्यमंत्री**

केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली काल दिल्लीत डेंग्यूच्या सज्जतेबाबत उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी राज्ये आणि नगरपालिका संस्थांनी आपली पूर्वतयारी करावी, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले. या बैठकीत देशातील डेंग्यूची सद्यस्थिती आणि देशभरात करण्यात आलेल्या तयारीच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

**झारखंड-मलेरिया**

झारखंडमधल्या पूर्व सिंगभूम जिल्ह्यात मलेरियाच्या चार रुग्णांचा मृत्यू झाल्यानंतर झारखंड सरकारनं राज्यव्यापी आरोग्य सतर्कतेचा इशारा काल जारी केला आहे. बाधित क्षेत्रांमध्ये तापाचं सर्वेक्षण करणं,मलेरियाची जलद चाचणी आणि त्वरित उपचार सुविधा पुरवणं तसंच गंभीर आजारी रुग्णांना तात्काळ रुग्णालयात दाखल करणं अशा सूचना आरोग्य विभागानं संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**इराण-अमेरिका**

इराण आणि अमेरिका यांच्यात काल दोहा इथं मध्यस्थांद्वारे चर्चा झाली. इराणचे माजी सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या 9 जुलैला होणाऱ्या अंत्यसंस्कारांनंतर चर्चा पुढे सुरू ठेवण्यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली असल्याचं कतार सरकारनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. दोहा इथल्या वाटाघाटी समाधानकारकपणे पुढे सरकत आहेत आणि तांत्रिक पातळीवरील चर्चा आधीच सुरू झाली आहे. असं अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. वान्स यांनी सांगितलं.

**रशिया-हल्ला**

रशियाने काल कीव्हवर जोरदार क्षेपणास्त्रे हल्ले केले. त्यामुळे ठिकठिकणी आग लागली आणि निवासी इमारतींचे नुकसान झाले. रशिया एका मोठ्या हल्ल्याची तयारी करत असल्याचा इशारा यूक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी दिला होता, त्यानंतर, लगेचच कीव्हमध्ये हे हल्ले करण्यात आले आहेत.

**अमरनाथ**

जम्मू आणि काश्मिरमधील श्री अमरनाथ यात्रेसाठी भाविकांच्या पहिल्या तुकडीला जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज सकाळी जम्मू इथल्या भगवती नगर बेस कॅम्पवरून हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. 57 दिवस चालणारी ही वार्षिक यात्रा 28 ऑगस्ट पर्यंत सुरू राहील. कडक सुरक्षा व्यवस्थेत भाविकांचा पहिला ताफा आज पहाटे जम्मूवरून रवाना करण्यात आला. यात्रेकरुंच्या सुरक्षेसाठी बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, उच्च तंत्रज्ञान आधारित सीसीटीव्ही कॅमेरे आणि आरएफआयडी ट्रॅकिंगची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**पीएफ**

'सामाजिक सुरक्षा संहिता, 2020' च्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून, केंद्र सरकारने भविष्य निर्वाह निधी म्हणजेच 'ईपीएफ योजना, 1952' च्या जागी 'ईपीएफ योजना, 2026' अधिसूचित केली आहे. डिजिटल अनुपालन बळकट करणे, प्रशासकीय कार्यक्षमता सुधारणे, खात्यांची पोर्टेबिलिटी वाढवणे आणि भविष्य निर्वाह निधीची रचना नवीन कामगार संहितेशी सुसंगत करणे ही या नवीन योजनेची उद्दिष्टे आहेत.

## ऑपरेशन सिंदूर

'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान 'इंटिग्रेटेड डिफेन्स स्टाफ'चे प्रमुख म्हणून काम पाहणारे एअर मार्शल आशुतोष दीक्षित यांनी काल 'व्हाइस चीफ ऑफ एअर स्टाफ' अर्थात वायू दलाच्या उपप्रमुखपदाचा पदभार स्वीकारला. त्यांनी एअर मार्शल नागेश कपूर यांच्याकडून सुत्र हाती घेतली. एअर मार्शल दीक्षित यांची 6 डिसेंबर 1986 रोजी भारतीय वायुसेवेत नियुक्ती झाली होती. ते राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी आहेत.

## लष्कर उपप्रमुख,दक्षिण मुख्यालय प्रमुख

लष्कराचे नवे उपप्रमुख म्हणून लेफ्टनंट जनरल संदीप जैन यांनी काल पदभार स्वीकारला. ते या आधी लष्कराच्या पुण्यातल्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख होते.

लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख अर्थात आर्मी कमांडर म्हणून लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यांनी काल पदभार स्वीकारला. लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर हे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे विद्यार्थी असून 1988 मध्ये लष्करात दाखल झाले आहेत.

## हेलीपॅड

भारताने आंध्र प्रदेशातील उंडावल्ली इथं हेलिकॉप्टर संचालनासाठी देशातील पहिल्या खाजगी पॉइंट-इन-स्पेस इन्स्ट्रुमेंट अप्रोच प्रक्रियेला मंजुरी मिळवून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. पिन्स प्रक्रियेमध्ये प्रगत उपग्रह-आधारित नेव्हिगेशन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, ज्यामुळे ज्या हेलिपॉर्टवर पारंपरिक लँडिंग पायाभूत सुविधा नाहीत, तिथे हेलिकॉप्टर सुरक्षित आणि अचूक पणे उतरू शकते. ही यंत्रणा भारतीय विमानतळ प्राधिकरणाने विकसित केलं आहे.

## क्रिकेट

भारत आणि इंग्लंड क्रिकेट संघांदरम्यान काल इंग्लडच्या चेस्टर-ले-स्ट्रीट इथं नियोजित असलेला 20 षटकांचा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. यामुळे पाच सामन्यांची ही मालिका सध्या 0-0 अशी बरोबरीत आहे. काल सामना सुरु झाला तेव्हा नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत भारतानं निर्धारित 20 षटकांत 7 बाद 189 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल इंग्लंड संघाकडून साकिब महमूदने 3 बळी घेतले. मात्र, पावसामुळे सामना थांबवावा लागल्यानं यजमान इंग्लंडला दुसऱ्या डावात फलंदाजीची संधी मिळाली नाही.

## फिफा

फिफा फुटबॉल विश्वकप स्पर्धेत काल बेल्जियम ने सेनेगल ला 3-2 ने हरवत जोरदार पुनरागमन करत प्रमुख 16 संघांमध्ये स्थान पटकावल आहे. दुसऱ्या एका सामन्यात इंग्लंड ने कोंगो ला 2-1 ने हरवल. अंतिम 16 संघात स्थान मिळवण्यासाठी आता येत्या 6 जुलै ला इंग्लंड चा सामना मेक्सिको शी होणार आहे.

## हवामान

देशाच्या विविध भागात जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पुढील दोन दिवसांत कर्नाटक, गुजरात, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाजही हवामान विभागानं  वर्तवला आहे. छत्तीसगड, हिमाचल प्रदेशसह विविध राज्य आणि महाराष्ट्रातील विदर्भातही पुढील तीन दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाची स्थिती राहण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.